शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक जुलै २०१९
अक क्र. ४०
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 48 अंक : 14 कोल्हापूर ता. 18 जुलै 2019 किंमत 2 रुपये Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS

## भिडे कुल संमेलन जानेवारी २०२०

कळविण्यास आनंद होतो की, दि. ४ व ५ जानेवारी २०२० रोजी १८ वे भिडे कुल संमेलन पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहामध्ये संपन्न करीत आहोत. पनवेलचे श्री. मंदार व सौ. मोहिनी तसेच प्रतिष्ठानचे दिवंगत विश्वस्त कै. विश्वासराव यांचे चिरंजीव व स्नुषा श्री. अनिरुद्ध (मंदार) व सौ. अश्विनी भिडे आणि इतर पनवेलच्या स्थानिक भिडे मंडळींच्या सहकार्याने आपण साजरे करीत आहोत. तरी सर्व भिडे कुलबंधु/भगिनी व माहेरवाशिणींनी आवर्जून उपस्थित राहावे हे अगत्याचे निमंत्रण आहे.

खरं तर सांगली संमेलनाची सांगता होतानाच पनवेलमध्ये संमेलन घ्यायचे असा दृढनिश्चय श्री. अनिरुद्ध (मंदार) व श्री. मंदार भिडे ह्या भिडे बंधुंनी केला. त्यामुळे मे महिन्यामध्ये कार्यकारिणीतील ४-५ जणांनी जाऊन संमेलन स्थळ त्वरित निश्चित केले. हे स्थळ आणि तारीख निश्चित करण्यामागे रेल्वे रिझर्वेशनच्या दृष्टीने सुकर व्हावे ह्यासाठी प्रतिष्ठान आग्रही होते. तसेच पनवेलच्या भिडे मंडळींनी सुद्धा तात्काळ दोन बैठका घेऊन स्थळ व तारीख लवकर निश्चित करण्यासाठी प्रयत्न केले. प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या गावामध्ये संमेलन व्हावे आणि ते सुद्धा निवासी असावे हे अपेक्षित असते. वास्तविक प्रत्येक माणशी रु. ६०० ही वर्गणी काही व्यक्तींना जास्त वाटत असेल. परंतु कमीत कमी खर्चात आणि उत्तम निवास, जेवण ह्या व्यवस्था किफायतशीर होण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केला जातो आहे. ह्याबाबत हा खर्च कमी करण्यासाठी संमेलनाचे प्रायोजकत्व भिडे कुटुंबातील व्यक्तींनी घेतल्यास सर्वांना संमेलनास येता येईल असेही मत व्यक्त केले जाते. म्हणून अशा दानशूर व्यक्तींनी हातभार लावला तर हे शक्य होऊ शकते.

पनवेल म्हणजे मुंबई, कर्नाटक, गोवा इत्यादींना जोडणारे एक मध्यवर्ती ठिकाण आहे. ह्या संमेलनामध्ये सक्रिय सहभागासाठी ठाणे, डोंबिवली, मुंबई उपनगरे, पुणे, कोकण, इत्यादी भिडे मंडळींनी सहभागी होऊन सहकार्य करावे हे विनंतीपूर्वक सांगू इच्छितो. प्रत्येक संमेलनामध्ये तरुणांचा प्रतिसाद व कार्यक्रम ह्याबाबत नेहमीच उलटसुलट मतप्रदर्शन होत असते. त्यादृष्टीने संमेलनाची उभारणी किंवा संमेलन कसे साजरे करावे किंवा काय बदल केला तर त्याचा उपयोग होईल ह्याबाबत आपले मत प्रत्यक्ष संपर्क करून अथवा लेखी स्वरूपात कळवावे. म्हणजे त्यादृष्टीने आपण सर्व मिळून आखणी करून संमेलन सर्वोत्कृष्ट कसे होईल आणि उपस्थिती वृद्धी होऊन आपल्या भिडे मंडळींना त्याचा कसा उपयोग होईल ह्याबाबत मार्गदर्शन व सूचना जरूर कळवाव्यात. आपला सहभाग व प्रतिसाद हीच भिडे प्रतिष्ठानची ताकद आहे.

– दिलीप भिडे

मो. ९६५७५४१२३६

## आम्ही भिडे जुलै अंक प्रायोजक

भिडे प्रतिष्ठानचे आर्थिक हात बळकट करण्यासाठी श्रीकृष्णनगर, बोरिवली (पूर्व), मुंबई येथील श्री. चंद्रशेखर, श्री. विवेक व श्री. मिलींद भिडे ह्या तीन बंधूंनी आम्ही भिडेच्या जुलै आणि ऑक्टोबर २०१९ ह्या दोन त्रैमासिक अंकासाठी देणगी देऊन, अंकाचा आर्थिक भार उचलून प्रायोजकत्व स्वीकारले ह्याबद्दल नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान आभारी आहे.

## भावपूर्ण श्रद्धांजली !



भिडे प्रतिष्ठानचे माजी कार्यकारिणी सदस्य आणि भिडे कुलवृत्ताच्या दुसऱ्या आवृत्तीचे सहसंपादक श्री. विद्याकर वासुदेव भिडे, पुणे ह्यांचे नुकतेच निधन झाले. कै. विद्याकर भिडे हे पुण्यामध्ये नू.म.वि. विद्यालयात शिक्षक व नंतर पर्यवेक्षक होते. ते अर्थशास्त्र व राज्यशास्त्रात बी.ए. आणि समाजशास्त्रामध्ये एम.ए. झाले. संस्कृतमधून एम.ए. ची पदवी त्यांनी वयाच्या ५२ व्या वर्षी घेतली. पुण्यनगरी, मेघदूत खंडकाव्याचा अनुवाद अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. समाजशास्त्र व भूगोल ह्या विषयांवर त्यांनी पाठ्यपुस्तकेही लिहिली आहेत. ते उत्तम प्रकारचे छायाचित्रकार व दुर्गप्रेमी होते. सुरुवातीला साध्या बॉक्स कॅमेऱ्याने सुरुवात करून पुढे दर्जेदार कॅमेऱ्याने हजारो छायाचित्रे त्यांनी काढली. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या पुण्यात झालेल्या पहिल्या सभेपासून ते प्रतिष्ठानच्या कार्यात सहभागी होते. इंग्रजी व मराठी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व वाखाणण्यासारखे होते कुलवृत्ताच्या दुसऱ्या आवृत्तीचे काम सुरू असताना त्यांनी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद होते. भिडे कुलवृत्तातील शुद्धलेखनातील चुका, विविध माहिती ह्या बाबतीत त्यांची मोलाची मदत झाली. नित्युंदन गोत्रीय प्रतिष्ठानकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांना चिरशांती देवो ही प्रार्थना.

## आजीव सभासदांचे माहितीसाठी

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार ता. २४ ऑगस्ट २०१९ रोजी सायंकाळी ६ वा. ब्राह्मण सेवा मंडळ, भवानी शंकर रोड, दादर (प.), मुंबई येथे संपन्न होईल. ह्या वार्षिक सभेची सूचना व ताळेबंद आजीव सभासदांना उपलब्ध असलेल्या पत्त्यावर पाठविण्यात येतील. तरी आजीव सभासदांनी याची नोंद घ्यावी.

## भिडे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना आवाहन

भिडे कुलवृत्ताची तिसरी आवृत्ती सॉफ्टवेअरमध्ये करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत हे आपणांस माहीतच आहे. मागील केलेल्या आवाहनाला भिडे मंडळींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील सुमारे ७५० पाने आपण वेळेअगोदरच पूर्ण केली. आता आपल्याला दुसऱ्या टप्प्यामध्ये आपण केलेल्या कामांची तपासणी करावयाची आहे म्हणजे मागील कुलवृत्ताप्रमाणे ही नावे, वंश, शाखा इत्यादी बाबी पुन्हा एकदा पडताळून पाहणार आहोत. शक्यतो बिनचूकपणा असावा आणि चुकीचे नाव, शाखा जोडले जाऊ नये ही अपेक्षा. ह्या संबंधी मार्गदर्शन व सूचना श्री. शंतनु निळकंठ भिडे, पुणे हे देतीलच. कृपया इच्छुकांनी संपर्क करावा ही विनंती. आपल्या सहकार्याशिवाय हे काम पूर्णत्वास येणार नाही. माझ्या माहितीनुसार वरील काम पूर्ण झाल्यावर आपण भिडे मंडळींकडून माहिती मागवून कुलवृत्तासाठी डेटा तयार करणार आहोत. त्यानुसार लवकरात लवकर हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. संपर्कासाठी....

श्री. शंतनु निळकंठ भिडे, पुणे - ७५८८३२१२८९.
e-mail - shantubhide@gmail.com

– दिलीप भिडे, पुणे (विश्वस्त/सचिव)

आम्ही भिडे **अंक ४० वा**

| | |
|---|---|
| संपादक : | श्री. शशिकुमार केशव भिडे |
| कार्यकारी संपादक : | श्री. प्रभाकर शंकर भिडे, |
| संपादक मंडळ : | श्री. दिलीप भिडे, ले. क. सुनिल भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. विनायक वि. भिडे, सौ. प्रिती भिडे, श्री. राजेंद्र भिडे |
| सल्लागार मंडळ : | श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, के. मो. भिडे, श्रीमती शशिताई घुले, श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे, डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे |
| अक्षर जुळणी : | सौ. विनीता डबीर |

पत्रव्यवहारासाठी पत्ता

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
मुंबई - ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१

**सर्व जाहिरातदार, बॅनर्सदार, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मन:पूर्वक आभारी आहे !**

**निवेदन..** जुलै २०१९ ह्या ४० व्या अंकापासून आपण वाढदिवस शुभेच्छांप्रमाणे विवाह शुभेच्छा सुरू केलेल्या आहेत. भिडे कुलबंधू-भगिनी व माहेरवाशिणींनी ९६५७५४१२३६/९६२३०१७४४४ किंवा ८३६९०६०९७९ वर मेसेज करून खालीलप्रमाणे माहिती द्यावी. आपले उभयतांचे पूर्ण नांव, गांव आणि विवाह तारीख

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. (१) श्रीमती विजया मोहन भिडे, पुणे (२) श्री. अजय अनंत भिडे, ठाणे

## भिडे विद्यार्थी/विद्यार्थिनींच्या घवघवीत यशासाठी त्यांचे हार्दिक अभिनंदन !

१) **कु. सोहीनी प्रसन्न जोगळेकर, रत्नागिरी**
इ. ८ वी च्या स्कॉलरशिप परीक्षेत रत्नागिरी जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये शहरी सर्वसाधारण गटात १० वा क्रमांक. २८८ पैकी २५० गुण.



२) **चि. सोहम प्रसन्न जोगळेकर, रत्नागिरी**
इ. १० वी, शालांत परीक्षेत ५०० पैकी ४७७ गुण. टक्केवारी ९५.४०




३) **कु. जान्हवी श्रीपाद भिडे, तळेगाव दाभाडे, पुण**
सीबीएससी बोर्ड, दिल्ली.
इ. १० वी शालांत परीक्षेत ५०० पैकी ४७३ गुण. टक्केवारी ९४.६०.



४) **कु. मृण्मय मंदार भिडे, रत्नागिरी**
इ. १० वी शालांत परीक्षेत ५०० पैकी ४७५ गुण. टक्केवारी ९५.



५) **कु. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी**
इ. १२ वी शालांत परीक्षेत ९६.४६%
जेईई परीक्षेत ९९.२२%



सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.

# लेखन स्पर्धा - २०१९-२०

मागील वर्षी आपण लेखन स्पर्धा घेतली होती. ह्यावर्षी पुन्हा आपण वेगवेगळे विषय देऊन स्पर्धा घेत आहोत. आलेल्या उत्कृष्ट लेखांना जानेवारी २०२० मध्ये होणाऱ्या भिडे संमेलनामध्ये भरघोस पारितोषिके दिली जातील. आपला प्रतिसाद हीच 'आम्ही भिडे'ची ताकद आहे.लेख पाठविण्यासाठी पत्ता – **दिलीप वासुदेव भिडे, सी-१०२, मेघमल्हार रागा अपार्टमेंट, एलएमडी चौकाजवळ, मराठा मंदिरमागे, बावधन, पुणे ४०००२१.** किंवा **dilip.bhide15@gmail.com** ह्या संकेस्थळावर सुद्धा पाठवू शकता. (शब्दमर्यादा ३०० शब्द) आलेल्या लेखांना ऑक्टोबर २०१९ च्या अंकापासून, प्रत्येक लेखाला प्रसिद्धी दिली जाईल. सोबत आपला एक 'आयकार्ड' साईज फोटो सुद्धा देणे आवश्यक आहे. लेख पाठविण्याची अंतीम तारीख ३० नोव्हेंबर २०१९. विषय खालीलप्रमाणे -

१) पहिलं-वहिलं - लहानपणापासून प्रत्येक नवीन किंवा प्रथम मिळालेल्या गोष्टीचे कुतुहल, कौतुक प्रत्येकालाच असते. माझी पहिली वही, पहिले पुस्तक, पहिली गाडी, घड्याळ, पहिला बंगला (जागा), फ्लॅट, मग ती वस्तू जुनी असो वा नवी परंतु आयुष्यामध्ये प्रथमच मला मिळाली किंवा मिळवली ह्याबद्दल कुतुहल किंवा अभिमान असतो. अशा वस्तूंची जपणूक करतो. ही वस्तू हरवली, किंवा विकायला लागली तर आपल्याला त्याचे दुःख होते. त्याच्या भूतकाळातील मनोरंजक, क्लेशदायक, आव्हानात्मक आठवणी शेअर करायच्या आहेत.

२) पर्यावरण - बिघडलेले निसर्गचक्र दुरुस्त करण्यासाठी किंवा भविष्यामध्ये पर्यावरण रक्षणासाठी आपण उचललेला खारीचा वाटा, पर्यावरणाचा सातत्याने होणारा ऱ्हास आणि त्यामुळे मानवी अस्तित्वाला निर्माण झालेला संभाव्य धोका, दूषित हवा, पाणी तसेच प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर होणारा परिणाम, कचरा व्यवस्थापन, जैव विविधतेचे जतन व विकास जागतिक तपमानवृद्धीबाबत योजना, पर्यावरणाचे जतन करण्यासाठी पूरक असे कोणते फायदे आहेत वा असावेत अशा नानाविध प्रश्नांवर तोडगे, उपाय, आपल्या कल्पना मांडाव्यात.

३) माझे माहेर - माहेर शब्द उच्चारला की महिलांचे भूतकाळात मन रमते. त्यावेळच्या आठवणी, आपले घर, शाळा, मित्र-मैत्रिणी, घरातले वातावरण, आई-वडील ह्यांच्या मायेची ऊब, प्रेम, संस्कार व शिस्त कशी होती ह्या बद्दल काही अनुभव आपल्या माहेरच्या पूर्ण नावासहित द्यावेत.

४) स्टार्टअप - मुले, मुली, गृहिणी छोटेखानी व्यवसाय करतात. कमी भांडवल असूनसुद्धा धाडस करतात. त्यासाठी मार्केटींग करण्यासाठी सोशल मिडियाचा वापर, गुणवत्ता टिकवण्यासाठी हुशारीने व्यवसाय करतात. त्यासाठी भांडवलाची जमवाजमव, उद्योग सुरू करण्याची कल्पना सुचणे, त्यामध्ये येणाऱ्या अडचणी आणि त्यातून निघालेला मार्ग ह्यांचा समावेश असावा.

५) भटकंती - भटकंती करण्यासाठी काही मंडळी देश-विदेशात आवर्जून भेट देतात तर काही कौटुंबिक मेळावा व कार्य ह्या निमित्ताने जातात, तर काहीजण कोणत्याही ट्रॅव्हल्स वा गाईडची मदत न घेता आपणच देश-विदेशात भटकंतीचे नियोजन करतात. अशा अपरिचित देश व विदेशात आलेले अनुभव.

६) माझा बगीचा - कधी मोठ्या जागेत, तर कधी गच्चीत किंवा गॅलरीच्या जागेत बगीचा फुलवून झाडांशी, निसर्गाशी आपले नाते कसे जवळचे आहे, अशा फळाफुलांनी बहरलेल्या तुमच्या बागेविषयी अनुभवासहित लिहा.

७) सूर, ताल, लय ह्यांच्या एकत्रिकरणातून मनाला भावलेलं गाणं तसेच त्या गाण्यामधील शब्द, चाल, वाद्यांचा वापर, गायकाचा आवाज, कलाकारांचा अभिनय ह्याबद्दल आपल्याला काय वाटतं ? असं गाणं की नकळत हसवणारं तर कधी डोळ्यांच्या कडा ओलावणारं, तर कधी भूतकाळात नेणारं आणि आपल्या आठवणी जागवणारं असं. मला भावलेलं गाणं.

८) परीक्षा : इ. १० वी १२ वी ची शालांत परीक्षा म्हणजे प्रत्येकाच्या आयुष्यातील व शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचा टप्पा असतो. आपल्या पाल्याची ही परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांबरोबर पालकांचीसुद्धा तारेवरची कसरत असते. ह्या आयुष्याच्या महत्त्वाच्या टप्प्यामध्ये यश मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेले प्रयत्न आणि पालकांची साथ आणि दिलेले प्रोत्साहन, की ज्या प्रयत्नांमुळे आपल्याला किंवा आपल्या पाल्याला घवघवीत यश मिळाले हे आपल्या अनुभवासह लिहा.

---

# आनंद आणि दुःख

मोजत बसू नये वर्ष आणि तारखा।
जीवनाचा आनंद घ्या फुलपाखरा सारखा॥
आनंदाचे क्षण असतात खूप कमी।
दुःखानंतर नक्की येईन अशी देऊन जातात हमी॥
दुःखाच्या सागरात आनंदाचा सूर्य उगवतोच।
फुल्यांची गुंफळ केल्यावर हार हा बनतोच॥
आपण दुःखात असलो तरी दुसऱ्यांना सुख द्यावे।
आपल्याला कुणी काटा दिला तरी त्याला फूलच द्यावे॥

*- करुणा भिडे,*
*इ. ९ वी,* डोंबिवली

# थोडा बरस रे बरस

आभाळाच्या खाली, धरतीच्या वरती
थोडा बरस रे बरस
तहानली सृष्टी, शेतकरी कष्टी
थोडा बरस रे बरस
भेगाळली माती, सुकलेली शेती
थोडा बरस रे बरस
सुकलेली राने, पिवळी झाली पाने
थोडा बरस रे बरस
तहानले पक्षी, नुसती ढगांचीच नक्षी
थोडा बरस रे बरस
कोरड्या रे विहिरी, कष्टल्या रे नारी
थोडा बरस रे बरस
गुरेढोरे भुकेलेली, त्यांची कत्तल चालली
थोडा बरस रे बरस
मोर नाचला थकला, पाणी नाही चातकाला
थोडा बरस रे बरस
मनमोर पेंगुळला, उदास जाहला
थोडा बरस रे बरस
सृष्टीच्या सृजनासाठी, तहानल्या ओठांसाठी
थोडा बरस रे बरस
थोडा बरस रे बरस
थोडा बरस रे बरस

*- प्रिती भिडे, पुणे*

# हरवले ते गवसले

- प्रा. प्रतिभा भिडे, कोथरुड, पुणे
ई-मेल : pratibhabhide2009@gmail.com

प्रत्येकाच्या आयुष्यात काहीतरी हरवण्याचे प्रसंग सततच येत असतात. साठीनंतर अनेक गोष्टी सारख्या हरवतात आणि सापडतात. पण आधीच्या आयुष्यांतही खूपवेळा खूप काही हरवते. अनेकवेळा हरवलेले सापडते, तर क्वचितप्रसंगी हरवलेल्या गोष्टी कधी न सापडण्यासाठीच हरवतात. कधी वस्तू हरवतात, कधी नातेसंबंध हरवतात, कधी भावनासुद्धा हरवतात. हरवलेले शोधण्याचा प्रयत्न करणं एवढंच आपल्या हातात असतं. अशाच काही हरवलेल्या व्यक्तींच्या, वस्तूंच्या भावनांचा आणि क्षणांच्या आठवणींना उजाळा देण्याचा एक छोटासा प्रयत्न.

माणसं हरवण्याच्या घटना खूपवेळा घडतात. वर्तमानपत्रात किंवा दूरदर्शनवर लापताच्या जाहिराती येतात. त्या आपण उत्सुकतेने वाचतो. पण माझी तक्रार एकच आहे की माणसं हरवल्याची बातमी येते पण सापडल्याची बातमी मात्र फारशी येत नाही.

माझ्या लहानपणी माझा मोठा भाऊ हरवला होता आणि तो एक मोठा किस्साच झाला. पावसाळ्याचे दिवस होते. खूप पाऊस कोसळत होता. दारापुढे पाण्याचा मोठा तलावच झाला होता. पाणी कमी होते तेव्हा आम्ही भावंडं कागदाच्या होड्या करून पाण्यात सोडण्याचा आणि एकमेकांच्या अंगावर पाणी उडविण्याचा खेळ खेळत होतो. कपडे खूपवेळा भिजायचे, घरात जाऊन ते बदलून यायचे. पुन्हा भिजायचे. असा खेळ रंगात आला होता. पावसामुळे शाळा केव्हाच सोडून दिली होती. त्यामुळे पावसात खेळण्याचा मनसोक्त आनंद आम्ही मुलं लुटत होतो. पाऊस पडतच होता. पण संध्याकाळ झाली म्हणून आईच्या सांगण्यावरून आम्ही सगळे घरात आलो. कपडे बदलून चुलीजवळ शेकत बसलो. कधी नाही तो आलं घातलेला गरम चहा प्यायला मिळाला. तेवढ्यात सगळ्यांच्या लक्षात आलं की चहा आणि खाणं प्रिय असणारा आमचा वसंता कुठेच दिसत नव्हता. सगळेजण अख्ख्या घरभर त्याला शोधून आलो. त्याकाळी फोन तर नव्हतेच. त्यामुळे माझा मोठा भाऊ आणि आमचा नोकर मल्लू सगळीकडे जाऊन वसंताला शोधू लागले. अंधार पडला पण भावाचा कुठेच पत्ता नव्हता. आईचं हळवं मन काळजीनं व्याकूळ झालं. दारापुढे दोन फूट उंचीचं पाणी साठलं होतं. त्या पाण्याला ओढही होती. अशा वाहत्या पाण्यात वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. (आमचा मल्लू पट्टीचा पोहणारा होता.) हे सर्व पाणी पुढे जाऊन एका नाल्याला मिळत असे. त्या नाल्याला जाळू बसवलेली होती. जर कोणी वाहात गेले तर ते त्या जाळीत अडकत असत. पण अडकणारी व्यक्ती जिवंत असण्याची शक्यता कमीच असायची. 'मल्लू' पाण्यात उडी मारायला निघाला आणि आपल्यापुढे आता काय वाढून ठेवले आहे या वाईट विचारांनी माझ्या आईला फीट आली. उभी असलेली आई धाडकन जमिनीवर कोसळली. आमच्या मधल्या खोलीत एका कपाटाजवळ ती पडली. चेहऱ्यावर पाणी मार, फोडलेला कांदा हुंगव, डॉक्टरांना बोलवा असे संगळं सुरू झालं आणि तेवढ्यात पुस्तकांच्या एका मोठ्या कपाटाचं दार धाडकन उघडले गेले आणि त्यातून नखशिखांत पाण्याने भिजलेला आणि छोटीशी चड्डी घातलेला वसंता, आई तुला काय झालं म्हणत बाहेर आला. बेशुद्धावस्थेतसुद्धा आपल्या जिवलगाची हाक आईला ऐकू आली आणि ती सावध झाली. आई मुळातच खूप रागीट होती. तिने काठी आणायला सांगितली. ती वसंताला मारण्याचा पवित्रा घेत होती तेवढ्यात सगळ्यांनी तिला आवरलं आणि वसंताने तिला धावत जाऊन मिठी मारली. सगळ्यांना खूप आनंद झाला पण कपाटात लपण्याचं कारण सगळ्यांना जाणून घ्यायचे होते. आपण खूप भिजलो होतो. खूप ओले कपडे अडगळीच्या खोलीत बोळे करून टाकले होते. आता घालायला कपडे नव्हते. आईच्या माराची आणि वडिलांच्या ओरड्याची भीती होती. म्हणून वसंता कपाटात जाऊन लपला होता. तो सापडला. खरं म्हणजे हरवला नव्हताच. पण त्यानेच हरविल्याचा आभास निर्माण केला होता. आणि त्यातून हे सारे भयनाट्य घडलं होतं. माझा हरवलेला भाऊ सापडल्याची ही गोष्ट अनेक वर्षे झाली तरी प्रत्येक पावसाळ्यात मला आठवते.

आम्ही एकदा युरोपला गेलो होतो. एका प्रवासी कंपनीबरोबर १६-१७ दिवसांची युरोप टूर आणि त्यातील प्रसंग अजूनही आठवणीत आहेत. आमची ट्रीप रोमहून सुरू झाली आणि लंडनला संपणार होती. शेवटचे २-३ दिवस आम्ही लंडनमध्ये होतो. शेक्सपिअरच्या आठवणी जपलेलं म्युझिअम बघत होतो. म्युझिअम बघून झाल्यावर आम्हाला एका ठिकाणी जमावयास सांगितले आणि आम्ही सारे जमलो. टूर मॅनेजरच्या लक्षात आलं की ८७ वर्षांचे कृष्णनकाका अजून येऊन पोचलेलेच नाहीत. छोट्या छोट्या अनेक गल्ल्या आणि छोटी छोटी घरं असलेले ते एक रम्य गाव होतं. आम्ही सगळे प्रवासी ४-५ जणांचा एक असे गट करून वेगवेगळ्या गल्ल्यांत काकांचा शोध घेऊ लागलो. भाषेचा प्रश्न गंभीर होता. काकांना हिंदी आणि इंग्रजीसुद्धा फारसं बोलता येत नव्हतं. सुमारे दीड-दोन तास शोधमोहीम चालू होती. पण काकांचा पत्ताच नव्हता. इतक्यात जवळच एक चेकपोस्ट दिसले. आमच्या मॅनेजरने कृष्णनकाकांचं वर्णन सांगितले आणि तिथली यंत्रणा कामाला लागली. एक व्हॅन अनाऊन्समेंट करत हिंडू लागली. आणि सुमारे अर्ध्या तासाने कृष्णनकाकांना घेऊन आमच्या संकेतस्थळी पोचली. सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. वरचेवर टूरवर जाणाऱ्या अनेकांना अशाप्रकारचे अनुभव आलेच असतील. असे तीन तास फुकट गेल्यानंतर आम्हाला ऑक्सफर्ड स्ट्रिटला फिरायला कमी वेळ मिळाला कारण तो आमचा लंडनमधील शेवटचा दिवस होता.

माणसे हरवतात तशा वस्तूही हरवतात. फारशा किमती नसतील तर त्याची फार चिंताही नसते. पण काही वस्तू किमती असतात. काही खूप महत्त्वाच्या असतात आणि अशा वस्तू हरवल्या की त्या शोधाव्याच लागतात. अशाच काही हरवलेल्या आणि सापडलेल्या वस्तूंच्या आठवणी मनात जाग्या झाल्या आहेत. आणि 'मी आधी, मी आधी' अशी घाई करतायत.

एकदा आमचे महत्त्वाचे कागदपत्र हरवले होते त्याची ही गोष्ट. माझे सासरे नुकतेच वारले होते. त्यांच्या मृत्यूनंतर विविध ठिकाणी वारसदारांची नावे लावयची होती. घर अलिबागला. शेती आणि छोटीशी वाडी अलिबागच्या जवळच्या गावात आणि आम्ही मुंबईला राहात होतो. माझ्या नणंदा एक भोपाळला तर दुसरी अकोल्याला राहात होती. विविध कागदपत्रांवर दोन्ही नणंदा व माझे मिस्टर यांच्या सह्या केलेले कागदपत्र आम्ही दोघांनी तयार केले. आम्ही वेगवेगळे लिफाफे तयार केले. आवश्यक ती तिकीटे लावली आणि एका रविवारी संध्याकाळी अनेक

कामांबरोबर तयार केलेली सगळी पाकिटे पोस्टाच्या पेटीत टाकण्यासाठी घेऊन बाहेर पडलो. सगळी कामे करून शेवटी जेव्हा पोस्टाच्या पेटीपाशी आलो तेव्हा आश्चर्याचा धक्का बसला. कारण आमच्या हातात कुठलेच लिफाफे नव्हते. आजूबाजूच्या १-२ दुकानांत आम्ही लिफाफ्यांचा शोध घेतला पण कुठेच लिफाफे मिळाले नाहीत. दरम्यान जोरात पाऊसही सुरू झाला आणि अतिशय खिन्न अंतःकरणाने आम्ही घरी परत आलो. चूक आमची होती आणि शोधण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले होते. केवळ देवाची प्रार्थना करणे आणि काही दिवस वाट पाहणे हेच आमच्या हातात होते. ८-१० दिवस उलटून गेले आणि मग वेगवेगळ्या कार्यालयांकडून आमच्या पत्रांना हळूहळू उत्तरं येऊ लागली. शब्दात व्यक्त करता येणार नाही इतका आनंद आम्हाला झाला. एक गोष्ट स्पष्ट झाली की कुठेतरी माणुसकी आहे. आमची पत्रं कुणालातरी सापडली असतील आणि ती पत्रं त्या व्यक्तीने कर्तव्यतत्परता दाखवली असेल आणि म्हणूनच आमची हरवलेली पत्रं योग्य त्या ठिकाणी पोचली. त्या अज्ञात व्यक्तीला या लेखाद्वारे मनःपूर्वक धन्यवाद. ही पत्रं सापडली नसती तर पुन्हा सगळी कागदपत्रे, त्यावर आवश्यक असणाऱ्या सह्या, शिक्के, ॲफिडेव्हिटस् पुन्हा करावी लागली असती.

आम्ही पुण्याला असताना माझ्या भावाचं घड्याळ हरवलं होतं. पूर्वीच्या शिवाजी पुतळ्याजवळ एका वाड्यात आमचं तीन खोल्यांचं घर होतं. एका खोलीला मातीचं सारवण होतं. माझा भाऊ त्यावेळी इंजिनिअरींगला कॉलेजला जायला निघाला तेव्हा त्याला त्याचं घड्याळ मिळेना. घरात खूप शोधलं ते मिळालं नाही. अशा वेळी कामाच्या बाईने चोरले असंही आम्हाला वाटलं. पण तिला विचारण्याचा धीर मात्र झाला नाही. आडून आडून आमचं घड्याळ हरवलंय ही बातमी इंदुताईच्या कानावर घातली. इंदुताई म्हणाल्या 'ताई तुमच्या घरात उंदीर आहेत का ? उंदरांनी घड्याळ नेलं असेल.' इंदुताईंचं बोलणं ऐकून आम्हा सगळ्यांना खूप हसू आलं. जेव्हा सारवलेल्या खोलीचा कोपरानकोपरा आम्ही शोधला तेव्हा एका कोपऱ्यात उंदराचं बीळ सापडलं. माझ्या भावाने आणि त्याच्या मित्राने केवळ शेवटचा पर्याय म्हणून ते बीळ उकरायचं ठरवलं. छोटीशी पहार घेऊन त्यांनी बीळ उकरलं. आणि काय आश्चर्य टॉर्चच्या प्रकाशात घड्याळाचा पट्टा चमकला. एका आकड्याने ते घड्याळ बाहेर ओढून काढलं. घड्याळ सापडलं. दुरुस्तीचा खर्च भरपूर झाला पण चोरी इतर कोणी केली नव्हती तर उंदीरमामाच चोर होते हे कळले.

माझी सोन्याची चेन हरवल्याची गोष्ट फारच रंजक आहे. मी चीनच्या टूरला गेले होते. १७-१८ दिवसांची ही टूर होती. आमची टूर जवळ जवळ संपत आली होती. आमचं वास्तव्य हाँगकाँगला होतं. प्रवासात जाताना सोन्याची जाड चेन गळ्यात नको म्हणून मी प्रवासासाठी ७-८ ग्रॅमची चेन मुद्दाम करून घेतली होती. प्रवासात खूपवेळा मी ही सोन्याची चेन घालायची. गळ्यातलं आणि कानातले बदलायची मला खूप आवड आहे. कधी चेन घाल, कधी मोत्यांची माळ घाल अशी बदलाबदली चालूच असते. रोज रात्री नियमितपणे बांगड्या, गळ्यातलं, कानातलं, घड्याळ सगळं काढून ठेवायचं आणि सकाळी ते परत घालायचं किंवा बदलून घालायचं. हाँगकाँगमध्ये आमचे दोन दिवस फिरून झाले होते. तिसऱ्या दिवशी सकाळी मी नेहमीप्रमाणे टेबलवरचे माझे दागिने गोळा केले तर त्यात माझी चेन नव्हती. मला नक्की आठवत होते की आदल्या दिवशी मी ती चेन घातली होती. बसची सीट अशी होती की सारखी ती मानेला घासायची. एकदा ती चेन माझ्या हातात आली होती. त्यामुळे मला वाटलं चेन बसमध्येच पडली असेल. माझ्या रूम पार्टनर सुधाताई म्हणाल्या चेन कदाचित तुम्ही काढली नसेल ती कॉटखाली पडली असेल. आम्ही लगेच रूम सर्व्हिसच्या माणसाला बोलावलं. त्याने कॉट, सोफा, गाद्या, चादरी सगळं उचकटून पाहिलं. चेन मिळालीच नाही. चेन कदाचित बसमध्ये असेल अशा आशेने आम्ही रोजच्यासारख्या बसमध्ये बसलो. पण ही बस दुसरीच होती. आजच्या दिवसासाठी वेगळी बस आहे असं सांगण्यात आलं. चेन सापडण्याचा शेवटचा आशेचा किरण नाहीसा झाला. आपली चेन हरवली आहे याचा गवगवा मला नको होता. म्हणून मी सुधाताईंना सांगितलं की माझी चेन तर गेलीच आहे पण तुम्ही कुणाला उगाच सांगू नका. मनाला फारस लावून न घेता आमचा हाँगकाँगमधला शेवटचा दिवस मी संपवला. आम्ही लगेज घेऊन विमानतळावर गेलो. माझी मोठी बॅग चेक इन करतानाच केबिन लगेजची बॅग सुद्धा ओझे नको म्हणून मी विमानात चढले. छोटी हॅण्डबॅग प्रवासी कंपनीने दिलेली होती. तिची बाहेरच्या कप्प्याची चेन सरकतच नव्हती. म्हणून मी फक्त प्लॅस्टिकच्या पिशवीत टाकून माझ्या स्लीपर्स, एक-दोन हरकाम्या पिशव्या, सुतळीचा गुंडा अशा वस्तू त्या चेन न लागणाऱ्या कप्प्यात टाकल्या. प्रवास संपला. मुंबईला उतरून स्पेशल टॅक्सीने आम्ही पुण्याला आलो. पहाटेच्या ३ वाजता घरी पोचले. शांतपणे फ्रेश होऊन मी झोपी गेले. सकाळी ६ वा. नेहमीप्रमाणे जाग आली. बॅगा रिकाम्या करायला मी सुरुवात केली. मोठी बॅग रिकामी झाली. हॅण्डबॅग रिकामी केली. चेन तुटलेल्या कप्प्यातून सपाता बाहेर काढल्या. बॅग उलटी करून झटकली. सुतळीच्या गुंड्याबरोबर माझी हरवलेली चेन अलगदपणे बाहेर आलीच. कशी असा प्रश्न पडला आणि मग आठवलं की हॉटेलमधील खोलीतल्या टेबलाजवळ ही हॅण्डबॅग होती आणि रात्री जेव्हा मी कानातले, गळ्यातले काढून ठेवले तेव्हा कदाचित ती चेन बॅगेच्या बाहेरच्या कप्प्यात माझ्या नकळत पडली असावी. विमानप्रवासात चेक इन केलेले सामान कसे हलवले जाते हे सांगायला नकोच. या सगळ्यात हॅण्डबॅगेच्या चेन तुटलेल्या कप्प्यातून थेट हाँगकाँगपासून पुण्यापर्यंत माझी चेन कशी येऊन पोचली याचं मला खूप आश्चर्य वाटलं. खऱ्या कष्टाच्या पैशाची ती चेन होती म्हणून तिला देवानं वाचवलं. सकाळी ७ वा. सुधाताईंना फोन करून ही बातमी सांगितली आणि त्यांना माझ्या आनंदात सहभागी करून घेतले.

खरे-खोटे हरवण्याचे भरपूर किस्से प्रत्येकाच्या आयुष्यात घडतात. आधी लिहिलेल्या चेनच्या किश्श्यासारखाच एक किस्सा माझ्या मोत्याचे मंगळसूत्र हरवण्याचा आहे. माझे वडील गेल्यानंतर माझ्या आईने तिचे बरेच दागिने विकून टाकले. तिच्याकडे मोत्याचे फारच थोडे दागिने होते. त्यातला एक म्हणजे उत्तम प्रतीच्या बारीक मोत्यांचं सोन्यात गंठण केलेले एक नाजूक मंगळसूत्र . तिच्याकडून ते सोन्याचं मोत्याचं मंगळसूत्र मी मागून घेतले. खूप वर्षे मी ते मधून मधून वापरत होते. आम्ही अलिबागच्या फ्लॅटमध्ये एक लोखंडी कपाट नेऊन ठेवले होते. अलिबागला गेलो की पैसे, छोटीमोठी चीजवस्तू त्या कपाटात सुरक्षितपणे ठेवली जायची. एकदा माझ्या लक्षात आलं की आपलं मोत्याचे मंगळसूत्र सापडत नाहीये. नेहमीप्रमाणे शोधाशोध केली आणि शेवटी ती वस्तू हरवली आहे असं समजून गप्प बसले. मधे बरीच वर्षे निघून गेली. मंगळसूत्र वापरण्याचं कारणही संपलं. २००६ मध्ये पुण्याला शिफ्ट होताना इतर सामानाबरोबर मी ते नेण्याचं ठरवलं. कपाट खूप जड होतं म्हणून कामगारांनी कपाटातले

कपडे आणि ड्रॉव्हर्स बाहेर काढून ठेवायला सांगितले. कपाट रिकामं झालं आणि त्यातली २-३ शेल्फ त्या कामगारांनी काढली. आवाज आला आणि एका शेल्फच्या मागून माझं मोत्यांचं मंगळसूत्र हळूहळू घरंगळत कपाटाच्या तळाशी येऊन पडलं. आश्चर्याचा सुखद धक्का बसला. नंतर मी ते मंगळसूत्र मुलीला देऊन टाकलं. आजही मधूनमधून ती ते मंगळसूत्र वापरते. आपल्या आजीचा मायेचा हात गळ्याभोवती असल्याचा भास तिला होत असेल असं माझ्या भाबड्या मनाला वाटतं.

दागिने हरवण्याच्या बाबतीत अगदी नुकताच घडलेला एक किस्सा. माझे सोन्याचे दागिने घरात नसतातच, पण कधीकधी काही कानातली, अंगठ्या, चेन अशा वस्तू लॉकरमधून काढून घालायचा मोह होतो. असंच एकदा छोट्या वाट्यांच्या आकाराचं आणि खूप सुंदर तास असलेलं माझं अगदी छोटं कानातलं मी घरी आणलं होतं. मधूनमधून मी ते घालायची. रोजच्या मध्यमप्रतीच्या कर्णफुलांच्या डबीत ते कानातलं ठेवून द्यायची. कामाच्या गडबडीत कसं कोण जाणे पण त्या सोन्याच्या सुबक कानातल्यांचा विसर पडला. एक दिवस आठवण आली तेव्हा सगळं घर धुंडाळून काढलं. डाव्या उजव्या हातानं ते कुठेतरी ठेवलं असेल म्हणून शोध चालूच होता. २-३ वेळा बँकेच्या लॉकरची कसून तपासणी केली पण कानातलं मिळालंच नाही. एके दिवशी माझी घरकाम करणारी मुलगी आणि मी देवपूजेच्या सामानाचं कपाट स्वच्छ करत होतो. वस्तूंचा पसारा घेऊन ती मुलगी जमिनीवर बसली होती. एका छोट्या स्टूलवर बसून मी तिला मदत करत होते. एकदम तिच्या कानाकडे लक्ष गेले आणि मी चमकले कारण माझ्या समजुतीप्रमाणे ते माझंच कानातलं होतं. तिला विचारलं तेव्हा ती म्हणाली हे सोन्याच्या रंगाचे खडे आहेत. मी ४० रु. देऊन रस्त्यावर विकत घेतले. घरात आम्ही दोघीच असल्यामुळे व माझ्याकडे कोणताच पुरावा नसल्याने मी फार कठोरपणे तिच्याशी वागू शकले नाही. तिला एवढंच म्हटलं की माझ्याकडेपण असेच कानातले आहेत. पण ते खूप दिवसांपासून हरवले आहेत. तू ते घरी जाताना काढून ठेव. मी उद्या माझ्या सोनाराकडे जाऊन ते सोन्याचे आहेत की खोटे आहेत याची चौकशी करीन व तुला परत देईन. तिने निमूटपणे ते टेबलवर काढून ठेवले. ती घरी गेली. ती दुसऱ्या दिवशी कामाला येईल असं मला वाटलच नव्हतं. पण ती रोजच्या वेळी कामाला आली आणि मग मात्र मी तिला ठासून सांगितले की ते कानातले माझेच आहेत. १०-१५ मिनिटांनंतर तिने आपली चोरी कबूल केली. मी एक दिवस कानातले घालून आले नव्हते म्हणून ते घालून गेले. २-३ दिवसात मी ते परत डबीत ठेवणारच होते. असा युक्तिवाद तिने सुरू केला. खूप रडणं, पाया पडणं असं बराच वेळ चालू होते. नंतर त्या प्रकरणावर मी पडदा टाकला. सोन्याचं कानातलं सहज दिसण्यासारख्या ठिकाणी ठेवणं ही माझी चूकच होती. त्या मुलीला मी कामावरून काढलं नाही पण आता मी खूप सतर्कपणे आपल्या किंमती वस्तू उघड्यावर ठेवत नाही. याच्या आधी १-२ वर्षात त्या मुलीने काही चोरले असेल, खास करून पैसे तर तो आपण केलेला दानधर्म होता अशी मनाची समजूत करून घेतली त्यामुळे मनाला शांतता मिळाली.

मध्यंतरी माझं एक नवं कोरं घड्याळ हरवलं होतं आणि ते सापडलं सुद्धा त्याची ही गोष्ट. घरातल्या घरात पाय घसरून पडल्यामुळे माझ्या पाठीला दोन फ्रॅक्चर्स झाली होती. सुमारे दोन महिने मला दिवसातले २३ तास झोपून राहायला सांगितलं होतं. पाठीला मोठ्ठा पट्टा लावलेला होता. अशा वेळी नेहमीची कामवाली बाई थोडसं जास्तीचं काम करायची. मुलगी येऊन जाऊन असायची पण घराची साफसाफाई आणि पसारा आवरणं ही कामं करायला कोणी नव्हतं. आठवड्यानी एकदा मी एका गाड्या पुसणाऱ्या मुलाला हे वरकाम करायला बोलावू लागले. घर थोडंसं आवरलं जाऊ लागलं. डस्टींगही होऊ लागलं. असं करता करता माझ्या लक्षात आलं की कपाटातलं नव कोरं घड्याळ दिसत नाही. जमेल तेवढी शोधाशोध मी केली. मग शेवटी त्या काम करणाऱ्या मुलाला विचारले. तो प्रथम कबूल होईना. पण नंतर त्याच्या वडिलांना मी ही गोष्ट सांगेन असं जेव्हा त्याला म्हटलं तेव्हा त्याने दुसऱ्या दिवशी माझं घड्याळ मला आणून दिलं. मी आजपर्यंत त्या मुलाच्या वडिलांना ही चोरीची गोष्ट सांगितली नाही. आपल्या बहिणीच्या वाढदिवसाला भेट म्हणून देण्यासाठी त्या गरीब मुलाने माझं घड्याळ चोरले होते ते मला आणून दिले. त्याला गोडीने समजावल्यानंतर मी त्याच्यावरचा राग विसरून गेले. नुकताच तो मुलगा १० वी पास झाला. चांगल्या कॉलेजात त्याने प्रवेश घेतला आहे. आजही तो स्वतःची प्रगती आनंदाने मला सांगतो. त्याचं आयुष्य चांगलं घडलं तर मला आनंदच आहे. माणसं हरवतात, वस्तू हरवतात, दागिने हरवतात आणि बरेचवेळा ते सापडतात. अशा हरवून सापडलेल्या अशाच आठवणी आतापर्यंत लिहिल्या आहेत. अशा अनेक गोष्टी असतील किंवा आहेत की ज्या हरवतात पण पुन्हा कधीच सापडत नाहीत. शारीरिक अस्तित्व नसलेल्या अशा गोष्टीही हरवतात आणि त्या बरेचवेळा सापडत नाहीत. अनेक मित्र-मैत्रिणी काळाच्या ओघात हरवून जातात. त्यांच्या त्यांच्या ठिकाणी ते असतातच. पण आपल्याला मात्र त्यांना भेटता आलेलं नसतं. फेसबुकसारख्या साधनांमुळे अनेक मित्रमंडळी शोधता येतात. पण माझ्या शाळा कॉलेजमधल्या मैत्रिणी मला कशा सापडणार ? निदान महाराष्ट्रात तरी मुलींची नावं आणि आडनावं लग्नानंतर बदलतात. त्यांचं अस्तित्व पुन्हा नव्या नावानं सुरू होतं. त्यांना कसं शोधायचं ?

आयुष्यातली अनेक नाती कायमची दुरावतात. खरं म्हणजे ती हरवतातच. कधी काळी ती पुन्हा सांधली जातात पण असं क्वचित होतं. आपलं आयुष्य क्षणाक्षणानं पुढे जात असते. एकदा गेलेला क्षण परत येत नाही. आलेला क्षण पूर्णार्थाने जगला नाही तर तो क्षण हरवून जातो. हरवलेला क्षण परत येत नाही. वस्तू सापडतात, माणसेही सापडतात, पण हरवलेले क्षण कधीच सापडत नाहीत. आला क्षण जगायचा. आपल्या स्मृतीत ठेवायचा आणि त्याच्या स्मृती हरवू द्यायच्या नाहीत एवढंच आपल्या हातात असतं. ■

**शिष्यवृत्ती विद्यार्थिनींसाठी.....** भिडे कुलोत्पन्नांपैकी गरजू व हुशार तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी **'प्रदीप व डॉ. शीला भिडे शैक्षणिक मदत'मधून भिडे प्रतिष्ठानकडून शैक्षणिक आर्थिक मदत/शिष्यवृत्ती सुरू केलेली आहे.** इच्छुकांनी आपले नाव, पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण अर्हता आणि पालकांचे उत्पन्नासह माहिती प्रतिष्ठानच्या पत्रव्यवहाराकरिता असलेल्या पत्त्यावर त्वरित पाठवावी. सदरहू शिष्यवृत्ती/मदत विनापरतफेडीची आहे ह्याची नोंद घ्यावी.

# व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### जुलै

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मुकुंद कृष्ण भिडे, बेळगांव | १ |
| २. | सौ. ज्योत्स्ना अरविंद परचुरे | १ |
| ३. | श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी | २ |
| ४. | श्री. शशिकुमार के. भिडे, पुणे | २ |
| ५. | श्री. समीर सुधीर भिडे, ठाणे | ५ |
| ६. | श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे, कल्याण | ७ |
| ७. | श्री. जयराम भिडे, सोलापूर | ७ |
| ८. | श्री. विमल रघुनाथ घाणेकर, पुणे | ८ |
| ९. | चि. अर्जुन विक्रम भिडे, पुणे | १३ |
| १०. | श्री. वि. क. भिडे, नाशिक | १४ |
| ११. | श्री. वसंत सदाशिव भिडे, बोरिवली | १५ |
| १२. | सौ. अंजली कुलकर्णी, मुंबई | १५ |
| १३. | सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई | १६ |
| १४. | श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली | १७ |
| १५. | श्री. अनिल वामन भिडे, पुणे | १७ |
| १६. | श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल | २० |
| १७. | सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा | २२ |
| १८. | कु. दीपांकिता सुनिल भिडे, पुणे | २३ |
| १९. | श्री. बळवंत भिडे, अंमळनेर | २३ |
| २०. | श्री. अरविंद विद्याधर भिडे, पुणे | २३ |
| २१. | श्री. विनय विष्णू भिडे, पुणे | २४ |
| २२. | चि. कपिल गणेश भिडे, पुणे | २५ |
| २३. | सौ. स्मिता सतिश भिडे, मुंबई | २७ |
| २४. | सौ. स्मिता नरेंद्र भिडे, ठाणे | २७ |
| २५. | श्री. शंकर त्रिंबक भिडे, पुणे | २८ |
| २६. | श्री. शंतनु शैलेश भिडे, सांगली | २८ |
| २७. | श्री. श्रेयस श्रीकृष्ण भिडे, मालाड | ३० |
| २८. | सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज | ३० |
| २९. | सौ. आरती विक्रांत भिडे, पुणे | ३० |

### ऑगस्ट

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. मीरा मधुकर भिडे, गुजराथ | ३ |
| २. | कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा | ६ |
| ३. | श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे | ६ |
| ४. | सौ. योगिनी माधव भिडे, पुणे | ७ |
| ५. | चिं. ओंकार मिलिंद भिडे, पुणे | १० |
| ६. | सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई | ११ |
| ७. | श्री. अमित दिलीप भिडे, पुणे | १२ |
| ८. | श्री. राजेंद्र महादेव भिडे, दादर | १३ |
| ९. | श्री. निळकंठ भिडे, नाशिक | १३ |
| १०. | सौ. प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे | १४ |
| ११. | कु. ऋता चिंतामणी भिडे, ठाणे | १५ |
| १२. | ले.क. सुनिल वासुदेव भिडे, पुणे | १५ |
| १३. | श्री. प्रशांत सदानंद भिडे | १६ |
| १४. | श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे | १८ |
| १५. | डॉ. संदीप दत्तात्रय भिडे, गुजराथ | १९ |
| १६. | श्री. प्रणव प्रसाद भिडे, पुणे | २० |
| १७. | सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली | २१ |
| १८. | श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे | २१ |
| १९. | सौ. सुजाता प्रदीप भिडे, पुणे | २१ |
| २०. | सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे | २२ |
| २१. | चि. अनय शुभानन भिडे, | २२ |
| २२. | डॉ. प्रमोद रामचंद्र भिडे, डिपोली | २२ |
| २३. | सौ. गौरी प्रदीप भिडे, डोंबिवली | २३ |
| २४. | श्री. निलेश अशोक भिडे, पनवेल | २६ |
| २५. | श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली | २६ |
| २६. | श्री. सुकृत सुभाष भिडे, सांगली | २६ |
| २७. | श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली | २७ |
| २८. | श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | २८ |
| २९. | सौ. सुचिता आशिष भिडे, भोपाळ | २८ |
| ३०. | सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे | ३० |
| ३१. | श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम | ३१ |
| ३२. | श्री. गोविंद काशिनाथ भिडे, सोलापूर | ३१ |

### सप्टेंबर

| | | |
|---|---|---|
| १. | कु. सुरभी राजेंद्र भिडे, डोंबिवली | १ |
| २. | श्री. केदार प्रभाकर भिडे, डोंबिवली | २ |
| ३. | श्री. अनंत हरी भिडे, मालाड | २ |
| ४. | श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे | ३ |
| ५. | सौ. वैजयंती रामचंद्र भिडे, कल्याण | ३ |
| ६. | कु. विश्वेश मुकुंद भिडे, बेळगाव | ४ |
| ७. | सौ. माधवी सारंग भिडे, सांगली | ४ |
| ८. | आर्या चारुदत्त भिडे, माभळे | ६ |
| ९. | श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे | ७ |
| १०. | श्रीमती आरती अनंत भिडे, चिपळूण | ७ |
| ११. | मनश्री मंदार भिडे, चिपळूण | ८ |
| १२. | श्री. प्रसाद प्रमोद भिडे, पुणे | ८ |
| १३. | सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर | ९ |
| १४. | कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे | १० |
| १५. | श्रीमती शशी मुरलीधर घुले, पुणे | ११ |
| १६. | श्री. प्रवीण भिकाजी भिडे, गोवा | १३ |
| १७. | सौ. मानसी चारुदत्त भिडे, माभळे | १४ |
| १८. | सौ. हर्षदा व्ही. भिडे, रायगड | १५ |
| १९. | श्री. आनंद भिडे, मुंबई | १६ |
| २०. | सौ. लता नारायण भिडे, जबलपूर | १६ |
| २१. | सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे | १८ |
| २२. | कु. प्रसाद केदार भिडे, डोंबिवली | १८ |
| २३. | श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे | १८ |
| २४. | श्रीमती ललिता र. केसकर | २० |
| २५. | सौ. रेणुका केदार भिडे, पुणे | २२ |
| २६. | कु. गौरी विनोद भिडे, औरंगाबाद | २२ |
| २७. | चि. जयराज विनोद भिडे, औरंगाबाद | २२ |
| २८. | श्रीमती वैशाली विलास भिडे, हैद्राबाद | २५ |
| २९. | कॅ. विवेक प्रभाकर भिडे, मुंबई | २६ |
| ३०. | कु. सारंग संतोष भिडे, ठाणे | २६ |
| ३१. | श्री. चैतन्य भिडे, नाशिक | २६ |
| ३२. | श्री. रोहित विजय भिडे, ठाणे | २७ |
| ३३. | सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा | २९ |
| ३४. | श्री. सुधीर गणेश भिडे, ठाणे | २९ |
| ३५. | श्री. बल्लाळ श्रीधर भिडे, चिपळूण | २९ |
| ३७. | सौ. मानसी विक्रम भिडे, पुणे | ३० |

# परशुराम - जीवनाचा उलगडा

हा एक विलक्षण प्रयोगी सुमारे पंचवीस हजार वर्षांपूर्वी होऊन गेला. कोकणस्थांचा हा मूळ पुरूष. आईकडून क्षत्रिय. बापाकडून ब्राह्मण. बापाच्या आज्ञेने ह्याने आईचे डोकेच उडविले. हे कितपत योग्य म्हणून कोणीही खुशाल विचारील. पण ह्याच्या श्रद्धेला साशंकता माहीतच नव्हती. निष्ठेने प्रयोग करावयाचा आणि अनुभवाने शहाणे व्हावयाचे असे ह्याचे सूत्र असे.

परशुराम त्या काळचा सर्वोत्तम पुरुषार्थी माणूस होता. त्याला दुःखितांविषयी कळवळा असे आणि अन्यायाविषयी तीव्रतम चीड. त्या काळी क्षत्रिय अगदीच माजले होते. ते आपणाला जनतेचे रक्षक म्हणवीत, पण व्यवहारात त्यांनी केव्हाचाच 'र' चा 'भ' करून टाकला होता. परशुरामाने त्या अन्यायी क्षत्रियांचा घोर प्रतिकार आरंभिला. सापडले तितके सारे क्षत्रिय त्याने सरसहा मारूनच टाकले. 'पृथ्वी निःक्षत्रिय करावयाची' हे त्याने आपले बिरुद बनविले. ह्यासाठी तो स्वतः आपल्याजवळ नेहमी कुऱ्हाड बाळगू लागला आणि कुऱ्हाडीने एक तरी क्षत्रिय मुंडके रोज उडविले पाहिजे अशी उपासना त्याने आपल्या ब्राह्मण अनुयायांत रूढ केली. हा पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा प्रयोग त्याने एकवीस वेळा केला. पण जुने क्षत्रिय बुद्ध्या मारावयाचे आणि अबुद्धीने नवीन निर्मावयाचे अशा प्रक्रियेने फलित काय निघणार ? शेवटी रामचंद्राने ह्याच्या डोळ्यांत अंजन घातले. तेव्हापासून त्याची दृष्टी निवळली.

मग त्याने कोंकणची त्या वेळची दाट जंगले तोडून वसाहत करण्याच्या विधायक कार्यक्रमाकडे आपला मोर्चा वळविला. पण कुऱ्हाडीच्या हिंसक प्रयोगाला सवकलेल्या त्याच्या अनुयायांना कुऱ्हाडीचा हा त्या मानाने अहिंसक प्रयोग निरस वाटला. आणि निर्धनाला जसे सगे-सोयरे तसे ते सारे त्याला सोडून गेले. पण हा निष्ठावान महापुरुष एकटाच काम करीत राहिला. ऐच्छिक दारिद्र्याला वरलेला रानी-प्रजेचा आदि-सेवक जो भगवान शंकर, त्याच्या ध्यानातून तो प्रतिदिन स्फूर्ती मिळवी. जंगल तोडणे, झोपड्या बांधणे, वन्य पशूंप्रमाणे तुटक जीवन जगणाऱ्या मानवबंधूंना सामुदायिक साधना शिकविणे, ह्या कामी ती स्फूर्ती राबवी. निष्ठावंत आणि निष्काम सेवा फार दिवस एकाकी राहू शकत नाही. परशुरामाच्या चिकाटीच्या सेवावृत्तीने कोंकणच्या जंगलातील ती रानवट माणसे विरघळली आणि त्यांनी त्याला शेवटी उत्तम साथ दिली. त्याने जुने ब्राह्मण म्हणविणारे जे अनुयायी त्याला सोडून शहरात पळून गेले होते त्यांच्याऐवजी हे नवे अवर्ण अनुयायी त्याला लाभले. त्याने त्यांना स्वच्छ आचार, स्वच्छ विचार आणि स्वच्छ उच्चार शिकविला. एक दिवस परशुराम त्यांना म्हणाला, 'भाई हो, तुम्ही आजपासून ब्राह्मण झालात.'

परशुरामाची आणि रामचंद्राची प्रथम भेट धनुर्भंगाच्या प्रसंगानंतर एकदा झालेली आणि त्याच वेळी त्याला रामचंद्राकडून जीवनदृष्टी मिळाली होती. त्यानंतर इतक्या वर्षांत त्या दोघांची भेट कधीच झाली नव्हती. पण रामचंद्र वनवासात असताना पंचवटीला येऊन राहिला होता, तेथल्या त्याच्या निवासाच्या शेवटच्या वर्षी परशुराम बागलाणच्या बाजूने त्याला भेटायला आला होता. तो जेव्हा पंचवटीच्या आश्रमात येऊन पोचला त्या वेळी रामचंद्र झाडांना पाणी घालीत होता. परशुरामाच्या भेटीने रामचंद्राला आनंद झाला. त्याने त्या तपस्वी आणि वृद्ध पुरुषाचे आदराने सांष्टांग-प्रणामपूर्वक स्वागत केले आणि कुशलप्रश्नादी झाल्यानंतर त्याच्या कार्यक्रमाविषयी विचारले. परशुरामाची कुऱ्हाड त्याच्याजवळ होतीच. त्याने कुऱ्हाडीच्या आपल्या नव्या प्रयोगाची सर्व माहिती रामचंद्राला दिली. रामचंद्राने ती ऐकून त्याचा फार गौरव केला आणि परशुराम दुसरे दिवशी तेथून परतला.

मुक्कामी आल्यानंतर आपल्या त्या नव्या ब्राह्मणांना रामाची सर्व हकिकत सांगून तो म्हणाला, 'रामचंद्र माझा गुरू आहे. त्याच्या पहिल्या भेटीत त्याने मला जो उपदेश दिला त्याने माझी वृत्ती पालटून मी तुमच्या सेवेला लागलो. ह्या भेटीच्या वेळी त्याने शब्दाने मला काहीच उपदेश दिला नाही. पण त्याच्या कृतीतून मला उपदेश मिळाला आहे. तोच मी तुम्हाला सांगतो. आपले हे जंगल तोडून वसाहत करण्याचे काम एक उपयुक्त सेवाकार्य आहे ह्यात शंका नाही, पण त्याचीही मर्यादा आहे. ती मर्यादा न ओळखता जर आपण झाडे तोडतच राहिलो तर ती एक मोठी हिंसा होईल. आणि कोणतीही हिंसा ती करणारावर उलटल्याशिवाय राहत नाही असा माझा अनुभव आहे. म्हणून झाडे तोडण्याचे काम आता आपण बस करूया. आतापर्यंत केले ते ठीक. कारण त्यामुळे मूळच्या असह्याद्रीचा हा आजचा सह्याद्री बनला. पण ह्यापुढे आपण जीवनोपयोगी वृक्षांच्या जोपासनेचेही काम हाती घेतले पाहिजे.' असे म्हणून त्याने त्यांना आंबे, केळी, नारळी, काजू, फणस, अननस इत्यादी लहान-मोठी फळझाडे कशी जोपासावीत ते शिकविले. अर्थात् त्यासाठी त्याला स्वतः वनस्पती संवर्धनशास्त्र अभ्यासावे लागले. त्याने आपल्या नेहमीच्या उत्साहाने ते अभ्यासिले. त्याने त्या शास्त्रात कित्येक महत्त्वाचे शोध केले. झाडांना मनोज्ञ आकार देण्यासाठी ती व्यवस्थित कापकूपण्याची गरज लक्षून त्याने त्यासाठी एक लहानसे औजार शोधून काढले. या औजाराला 'नव परशु' असे नाव देऊन त्याने आपली परशूची उपासना अखंड राखली.

एकदा समुद्रकाठी नारळी लावण्याचा एक सामुदायिक समारंभ त्याने घडवून आणला. त्या निमित्ताने जमलेल्या मंडळींपुढे त्याने आपल्या जीवनातील सर्व प्रयोगांचे आणि अनुभवांचे सार मांडले. समोर भरतीचा समुद्र गर्जून राहिला होता. तिकडे हात करून समुद्रवत् गंभीर ध्वनीने तो त्यांना म्हणाला, 'भाई हो, हा समुद्र आपणाला काय शिकवित आहे ते लक्षात घ्या. एवढा प्रचंड शक्तिशाली, पण आपल्या परम उत्कर्षाच्या वेळीही तो आपली मर्यादा लंघीत नाही. म्हणून त्याचे बळ सतत टिकून आहे. माझ्या सर्व उद्योगांतून आणि प्रयोगांतून मी हेच निष्कर्षिले आहे. मी लहानपणी पित्याच्या आज्ञेवरून आईचा वध केला. लोक म्हणाले, 'केवढा मातृहत्यारा !' तो आक्षेप मला कबूल होत नव्हता. मी म्हणे, 'आत्मा अमर आहे आणि शरीर मिथ्या आहे. कोण कोणाला मारतो ? मी मातृहत्यारा

**निवेदन :** आपले कुलबांधव/भगिनी/माहेरवाशिणींकडून 'आम्ही भिडे' अंकाच्या वर्गणीबाबत सातत्याने विचारणा होत असते. हा अंक वर्गणी न घेता विनामूल्य सर्व भिडे कुलोत्पन्नांना वितरित करीत आहोत तरीसुद्धा ज्या कोणाला अंकासाठी आर्थिक हातभार लावावा असे वाटत असेल त्यांनी देणगी, मदत रोख वा धनादेशाद्वारे पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर पाठवावे. धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' ह्या नावाने पाठवावे किंवा त्या खात्यामध्ये ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. संपूर्ण अंकाचे प्रायोजकत्व सुद्धा स्वीकारले जाईल.

## एक स्वप्न...

मी सांगते माझ्या स्वप्नातली गोष्ट
बनले होते गायिका आयुष्यातली श्रेष्ठ।
गाता गाता गायले सा, रे, ग, म, प, ध, नी।
मिळाले हे सात स्वर मनात खूप शोधुनी॥
कार्यक्रमात एका साधेच गाणे गायले।
नाही मला कळले मी मोठी कशी झाले॥
गाता गाता मी लिहूसुद्धा लागले।
जणू एकच जादूचे पेन माझ्या हाती लागले॥
मला अनेक कार्यक्रमांत बोलावू लागले लोक।
पार केले मी गाण्याचे शेवटचे टोक॥
माझ्या प्रत्येक गाण्याला मिळाला वन्स मोर।
जणू विराटने मैदानावर मारले सिक्स आणि फोर॥
तेवढ्यात मला आईने हाक मारली उठ।
बंद झाली माझ्या हातातली स्वप्नांची मूठ॥

*- करुणा भिडे,*
*इ. ९ वी,* डोंबिवली

## एक पणती

काळोखाच्या गुहेत
अडकलेल्या मनाला
मंद प्रकाशाने सोडवणारी एक पणती...
अंधारात असणाऱ्या
लोकांच्या घरासमोर
रांगोळीत स्निग्ध प्रकाशाने चमकणारी एक पणती...
इच्छा अपूर्ण असणाऱ्यांना
त्या पूर्ण करण्यासाठी
आशेचा किरण दाखवणारी एक पणती...
निराशेच्या काळजीला
हलकेच झटकून
चैतन्याच्या उंबरठ्यावर तेवणारी एक पणती...
तेलाशी खेळणारी
कापसाशी जुळवून घेणारी
अग्नीच्या साथीने डोळे दीपवून टाकणारी एक पणती..

*- करुणा भिडे,*
*इ. ९ वी,* डोंबिवली

## सद्गुरुमहिमा

ऐसा सद्गुरुमहिमा। सुखाची परिसीमा।
पुनवेचा चंद्रमा। अमृत वर्षवी जैसा॥१॥
सदैव सद्गुरू माझे जवळ। ऐशी जाणीव धरिता केवळ।
पीडा-संकट-दुःखे सकळ। दूर होती क्षणमात्रे॥२॥
सद्गुरूशी आठवाल। हृदयकमळी साठवाल।
मनभ्रमर गुंजेल। सभोवताली॥३॥
असे हा कल्पतरू। ज्ञानाचा भांडारू।
जीवनवेलीचा आधारु। सद्गुरू माझा॥४॥
महिमा त्याचा अपार। प्रेमदयेचा सागर।
नेईल पैलपार। जीवननौका॥५॥
लाभता हा परिस। स्पर्शून जाईल तनमनास।
तेजाळुनि कणाकणांस। सुवर्णकांती देईल॥६॥
नको संसाराची चिंता। तोच कर्ता करविता।
भवभय, चिंता, व्यथा। आता कैसी उरेल ?॥७॥
सरावे माझे 'मी'पण। ध्यास एक रात्रंदिन।
नयनापुढती गुरुचरण। दुजे काही नुरावे॥८॥
ॐ सद्गुरू मालतीआई। नमन माझे तव पायी।
बसावे नित मम हृदयी। न्यावे मजसि मोक्षपदा॥९॥

*- सौ. मीना राजवाडे, सांगली.*
मो. ९०११०५११३७६

## परशुराम - जीवनाचा उलगडा

नव्हे, पर पितृभक्त आहे.' पण माझी चूक आज माझ्या लक्षात येते. मातृवधाचा आरोप मला त्यावेळी कबूल नव्हता, तसा आजही नाही. पण पितृभक्तीलाही मर्यादा असते ही गोष्ट माझ्या लक्षात आली नाही. हा माझा खरा दोष होता. लोकांनी नेमका तेवढाच दाखविला असता तर त्याने माझी विचारशुद्धी झाली असती. पण त्यांनीही मर्यादा सोडून भलताच आक्षेप घेतला, आणि त्यामुळे माझ्या विचारशुद्धीला काहीच मदत झाली नाही. पुढे मोठेपणी अन्याय-प्रतिकाराचे व्रत पत्करून मी जुलमी सत्तेशी एकवीस वेळा झुंजलो. प्रत्येक वेळी मी यशस्वी झालोसे दिसावे आणि प्रत्येक वेळी नेमके अपयश माझ्या पदरी पडावे. रामचंद्राने माझी चूक मला पटवली. अन्याय-प्रतिकार हा मानवाचा धर्म खरा, पण त्याचीही शास्त्रीय मर्यादा आहे हे ज्ञान मला गुरुकृपेने लाभले. पुढे मी जंगल तोडून वसविण्याच्या मानव-सेवेच्या कार्यात पडलो. पण जंगल तोडण्याचीही मर्यादा आहे ही गोष्ट मला वेळेवर कशी सुचली ते तुम्हाला विदित आहेच. आतापर्यंत मी निरंतर प्रवृत्ती आचरीत राहिलो. पण शेवटी प्रवृत्तीचीही मर्यादा आहेच ना ? म्हणून ह्यापुढे मी निवृत्त होईन म्हणतो. म्हणजे कर्मच सोडून देईन असे नव्हे. पण स्वतंत्र नवीन प्रवृत्ती मी उभारणार नाही. प्रवाहपतित करीत राहीन. प्रसंगी विचाराल तेव्हा सल्लाही देईन. पण म्हणून आज मी हा मुद्दाम प्रसंग योजिला आणि हे समुद्रोपनिषद् म्हणा की माझे 'जीवनोपनिषद्' म्हणा, तुम्हास निवेदिले. पुन्हा थोडक्यात सांगतो, पितृभक्तीची मर्यादा, प्रतिकाराची मर्यादा, मानवसेवेची मर्यादा आणि एकूण सर्वच प्रवृत्तीची मर्यादा हे माझे जीवनसार. म्हणा एकदा सगळे - 'ॐ नमो भगवत्यै मर्यादायै।'

इतके बोलून परशुराम शांत झाला. त्याच्या उपदेशाचे खोल पडसाद सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत अजून ऐकू येत असतात.

*(दि. १५-७-१९४१. ग्रा.से.वृ. ५-४)*

### एप्रिल ते जून २०१९ पर्यंतचे देणगीदार

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. नितीन विश्वनाथ भिडे, दापोली | रु. १०००/- | आजीव सभासद |
| २) | कु. स्वराली नितीन भिडे, दापोली | रु. १,०००/- | आजीव सभासद |
| ३) | सौ. मेघना आशिष भिडे, पुणे | रु. १,०००/- | आजीव सभासद |
| ४) | श्री. शंतनु निळकंठ भिडे, पुणे | रु. १,०००/- | आजीव सभासद |
| ५) | श्री. चंद्रशेखर विवेक आणि मिलींद भिडे, बोरिवली | रु. १०,०००/- | आम्ही भिडे अंक देणगी |
| ६) | श्री. मिलींद माधव भिडे, मुंबई | रु. ११,०००/- | देणगी |
| ७) | श्री. मिलींद डी. भिडे, छत्तीसगड | रु. १०,०००/- | देणगी |

### नम्र सूचना

ज्या कुलबंधू, भगिनींनी व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे' अंक मिळत नाही अथवा भिडे प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील व्यक्तींना संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर द्यावा अथवा पत्राने कळवावे तसेच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.

| | |
|---|---|
| प्रशांत भिडे, सातारा | ले.क. सुनिल भिडे, पुणे |
| ७७७६०२०७७९ | ९६२३०१७४४४ |
| सौ. संपदा भिडे, मुंबई | प्रदीप ज. भिडे, डोंबिवली |
| ९८१९९५१३९१ | ९८९२५०४०४२ |

# आशापूर्णादेवी : ज्ञानपीठ पुरस्कार

– श्रीमती सुमती भिडे, पुणे
मो. ०२०-२५४४११६१

जागतिक महिला दिन ८ मार्चला नुकताच झाला. त्यानिमित्त पहिल्या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या आशापूर्णादेवी (बंगाली) ह्यांचा परिचय. १९७६ साली त्यांच्या 'प्रथम प्रतिश्रुति' ह्या बंगाली भाषेतील कादंबरीस देण्यात आला आणि भारतीय भाषांमधली सृजनात्मक साहित्यातील सर्वश्रेष्ठ साहित्यकृती म्हणून घोषित करण्यात आले.

**ज्ञानपीठ पुरस्कार –**

ज्ञानपीठ पुरस्कार हा भारतीय साहित्य जगतात नोबेल पुरस्काराइतकाच सर्वश्रेष्ठ पुरस्कार समजला जातो. ह्या पुरस्कारामागची प्रेरणा आहे ती रमा जैन यांची. त्यांच्या कौटुंबिक ट्रस्टमधून ह्या पुरस्काराची रक्कम दिली जाते. भारतीय सर्व भाषांमधील श्रेष्ठ साहित्यिकाला हा पुरस्कार दिला जातो. १९६५ सालापासून हा पुरस्कार देणे सुरू झाले. मराठी भाषेमधील चार साहित्यिकांना हा पुरस्कार देण्यात आला. १) वि. स. खांडेकर यांना ययाती कादंबरीसाठी १९७४ साली, २) वि. वा. शिरवाडकर – कुसुमाग्रज. १९८२ सालापासून हा पुरस्कार एकाच साहित्यकृतीला न देता त्या लेखकाच्या संपूर्ण साहित्याचा विचार करून दिला जातो. ३) विंदा करंदीकर यांना २००३ साली ज्ञानपीठ पुरस्कार देण्यात आला, ४) भालचंद्र नेमाडे ह्यांना २०१४ साली हा पुरस्कार देण्यात आला.

विशेष म्हणजे मराठी स्त्रियांमधील साहित्यिकांना हा पुरस्कार अजून मिळाला नाही. (दुर्गा भागवत, इरावती कर्वे ह्यांना सुद्धा !) कारण आपण मराठी माणूस प्रसिद्धीच्या झोतात नाही. इतर भाषेतील साहित्यिकांना आणि पुरस्कारांची निवड करण्यापर्यंत मराठी स्त्री साहित्यिकांची माहिती पुरवली जात नाही.

**ज्ञानपीठ प्रथम पुरस्कार विजेत्या आशापूर्णा देवी ह्यांचा परिचय –**

आशापूर्णा देवी ह्यांचा जन्म ८ जानेवारी १९०९ साली एका कर्मठ रूढीप्रिय मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे रूढार्थाने शालेय शिक्षण झाले नाही. पुरुषप्रधान संस्कृती त्यावेळी साऱ्या देशातच चालू होती. बायकांनी फक्त रांधा वाढा उष्टी काढा एवढेच करावे. बौद्धिक क्षेत्रात त्यांना वाव नाही. आशापूर्णादेवींना शाळेत घातले नव्हते तरी त्यांना अक्षर ओळख करून दिली होती. वडील हरेंद्रनाथ आणि आई सरलासुंदरी पुरोगामी विचारसरणीचे होते. स्त्रियांच्या बौद्धिक कुचंबणेविदरुद्ध त्यांच्या मनात विद्रोह असला तरी सासूपुढे काही बोलू शकत नव्हत्या. तरीही त्यांचे पती पत्नीसाठी आणि मुलींसाठी अनेक मासिके, पुस्तकेविकत घेऊन त्यांचे वाचन वेड पुरवित असत. झपाटल्याप्रमाणे आई व मुली जमेल तसे वाचन करीत. बंकीमचंद्र, रवींद्रनाथ टागोर, शरच्चद्रांनी बंगाली स्त्रीचं भावविश्व इतकं हृदयस्पर्शी लिहिले आहे की अनेक बंगाली स्त्रियांप्रमाणे आशापूर्णादेवी ह्यांनी ह्या पुस्तकांच्या वाचनापासून प्रेरणा घेऊन त्यावेळच्या स्त्रीजीवनाचं वास्तव चित्रण आपल्या लेखनामधून केलं. वडीलभावाच्या अभ्यासगृहामध्ये डोकावून त्या ते धडे, कविता पाठ करू लागल्या. भावाच्या मदतीने लेखनकला अवगत केली. मूळचीच प्रतिभा आणि सृजनशक्ती असलेल्या आशापूर्णादेवी ह्या छंदातून उत्स्फूर्त काव्य निर्माण करू लागल्या. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांनी 'बाईदेर डाक' ही कविता लिहून 'शिशूसायी' मासिकासाठी पाठविली. ती प्रसिद्ध झाली. तेव्हापासून त्यांचं लेखन अविरत सुरू झालं. कधीही त्यांचं लेखन संपादकांकडून नाकारलं गेलं नाही. उलट दिवसेंदिवस संपादकांकडून त्यांच्या लेखनासाठी मागणीच असायची.

त्यांची लेखनाची सामग्री म्हणजे त्यांच्या भोवतीची माणसं. सर्व स्तरांवर होणाऱ्या स्त्रियांच्या वंचनेला कुटुंबातल्या त्यांच्या स्थानाबद्दलचे बंडखोर विचार त्यांनी सातत्याने मांडले. लहान वयातच 'देवी ओ मानवी' ह्या कवितेत त्यांनी हे देवी लक्ष्मी, आम्ही तुझी पूजा करतो तरीही विष्णुच्या पायाशीच तुझे स्थान का ? स्वतःची अशी अवहेलना का करून घेतलीस ? त्यावेळच्या कर्मठ समाजाकडून त्यांना विरोध झाला. त्यांचा कुटुंब व्यवस्थेवर विरोध नव्हता. फक्त कुटुंबातल्या स्त्रियांच्या बौद्धिक कुचंबणेवर. ह्या अशिक्षित बाईंनी साऱ्या आयुष्यभरच्या लेखनातून स्त्रियांची बौद्धिक खच्ची करणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीवर प्रहार केले. उपजत सृजनशक्ती लाभलेल्या आशापूर्णादेवींनी मानवी मनाच्या अंतःकरणात खोलवर शिरून त्यांच्या मनातील वेदना शब्दांत साकारल्या. स्त्रियांच्या अवहेलना हे प्रमुख लेखनाचे उद्दिष्ट असले तरीही बालवाङ्मयात घण्टु – अनाथ मुलगा, त्याचे बालवयातील विदारक चित्रण त्यांनी केले आहे. त्याचप्रमाणे रूढीमधल्या एकत्र कुटुंब पद्धतीत वडिलधाऱ्या व्यक्तीमुळे पुरुषांचाही कोंडमारा होतो. त्यांचे अधिकार त्यांना मिळत नाहीत. मग अशा दुर्बल, असहाय्य व्यक्ती त्यांचा राग पत्नीवर काढतात. अशा पुरुषांची चित्रणंही त्यांच्या लेखनात आढळतात. 'प्रथमप्रतीश्रुती' ही त्यांची उत्कृष्ट रचना आहे. त्यात १९ व्या शतकातील प्रारंभापासून टप्याटप्प्याने स्त्रीमुक्तीच्या घुसमटीचे आणि स्त्रियांना पुरुषांचे बरोबरीने सर्वक्षेत्रांत स्थान मिळावे, स्त्रियांनीही पुरुषांप्रमाणेच उच्चशिक्षित व्हावे ह्यासाठी ह्या कादंबरीतील नायिका सत्यवती ही कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. तिचे जीवन आणि तिने केलेला संघर्ष ज्यामधून सत्यवतीने टप्प्याटप्प्याने मुक्ती मिळवली, आत्मविश्वासाने कशा तऱ्हेने यशस्वी झाली ह्याचे चित्रण आहे. ह्या साहित्यकृतीत केवळ तत्कालीन बंगाली स्त्रीचे चित्रण केलेले नाही तर लेखिकेने मानवी स्वभावावर अशी टिप्पणी केली आहे की त्याची प्रासंगिकता खूपच व्यापक आहे. त्यातून भारतीय स्त्रीचे मोठेपण प्रतिबिंबीत झाले आहे.

पुरुषप्रधान संस्कृती असूनही त्यांचे पती कालिदासबाबूंनी त्यांना लेखनासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले. पतीची साथ होती म्हणून त्या रात्री पतीच्या टाइपरायटरवर साहित्यनिर्मिती करू लागल्या. बाईंना फक्त बंगाली भाषाच अवगत होती. भगवद्गीतेवर त्यांची नितांत श्रद्धा होती. कालिसिंह लिखित महाभारताची आशापूर्णादेवी यांनी पारायणे केली होती. तर टागोरांच्या कितीतरी कविता, गीते त्यांना पाठ होती.

त्यानंतर काळ बदलला. स्वातंत्र्य आंदोलन, स्वातंत्र्यानंतरच

# योग

– राजेंद्र भिडे, दादर
मो. ९९२०९६९३२८

आज योगायोगाने एक शब्द वाचनात आला आणि त्याबद्दल जाणून घ्यायचा योग आला. तो शब्द म्हणजे योग. मी योग करतो म्हणजे योगासन करतो असा सर्वसाधारण अर्थ समजला जातो. योग म्हणजे विश्वभरात शरीर स्वास्थ्य टिकविण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने केले जाणारे प्राणायाम व व्यायाम प्रकार हे सर्वांनाच माहीत आहे. खरंतर फक्त योगासन म्हणजे योग नव्हे. या शब्दाचा अर्थ हा खूप विस्तृत आहे. एखादी गोष्ट होणे म्हणजे योग येणे. अध्यात्मिकदृष्ट्या, अनुग्रहित साधकाने जी साधना करायची असते त्याला कृपायोग म्हणतात. अंकगणिताच्या भाषेत सांगायचं तर योग म्हणजे बेरीज. म्हणजे प्रत्येकवेळी वाक्यरचनेप्रमाणे, परिस्थिती बघून योग या शब्दाचा अर्थ बदलतोय. मग योग ह्या क्लिष्ट शब्दाचा विरुद्धार्थी शब्द वियोग असेल तर अर्थ समजून घेणे सोपं होईल. वियोग म्हणजे दुरावणे किंवा संपर्क तुटणे असेल तर योग म्हणजे परिपूर्ण संपर्क.



पाच हजार वर्षांपूर्वी श्रीकृष्णाने प्रिय सखा अर्जुनाला नैराश्य झटकून टाकून आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा असावा हे समजून सांगताना योग या शब्दाचा वापर जीवन जगण्याचा मार्ग अशा अर्थाने केला. श्रीभगवंतांनी भगवत गीतेमध्ये ७८ वेळा योग हा शब्द 'नाम'वाचक, तर ३६ वेळा त्यांनी योगयुक्त असा 'क्रियापद' म्हणून वाक्यप्रयोग केला. याचा अर्थ श्रीभगवंतांना योग या शब्दाद्वारे खूप काही स्पष्ट करायचे होते. योग शब्दाचे अनेक रंग व छटा श्रीकृष्णानी विश्वाला उलगडून दाखवल्या. अनुराग, भय आणि क्रोध हे आपल्या आयुष्यातून समूळ नष्ट करून आपले आयुष्य भगवंताला स्मरून आनंदात कसे जगावे यासाठी त्यांनी उपदेश केला. आपल्या गरजा, रुची आणि चिंता दूर ठेवून इतरांच्या गरजा, रुची ओळखून ज्यांच्याशी संपर्क प्रस्थापित करण्यावर आपले लक्ष केंद्रित करायचे ह्याला संवादाचा योग म्हणतात. प्रभू रामचंद्र आणि लक्ष्मण ह्यांचे स्वभाव खूप वेगळे होते. पण प्रभू रामचंद्रांनी लक्ष्मणाला त्याच्या क्रोधावर संयम ठेवण्यासाठी वेळोवेळी साहाय्य केले. त्यामुळे त्यांच्यातील संबंध परिस्थिती कितीही विपरित आली तरी प्रेमाचे आणि विश्वासाचे होते. प्रभू रामचंद्रांवर त्यांची प्रजा खूप प्रेम करीत असे. कारण त्यांनी प्रजेच्या समस्या समजून घेत त्यावर उपाय सुचविले. उत्सवात प्रजेबरोबर सहभागी झाले व परिपूर्ण संवाद साधण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्याच्या मताचा स्वीकार करताना प्रसंगी स्वतःचे मत बाजूला ठेवून संपर्क प्रस्थापित करणे याला सहभागाचा योग म्हणता येईल. महाबली हनुमान हे स्वतः रुद्रावतार होते. तरी त्यांनी स्वतःच्या मतापेक्षा प्रभू श्रीराम आणि वानरराज सुग्रीव यांच्या मताला आणि क्षमतेला जास्त महत्त्व दिले. सीतामातेला भेटल्यावर त्यांनी प्रभूरामचंद्रांच्या सेनेतील मी एक साधा सैनिक आहे असा परिचय करून दिला. खरंतर सीतामातेला उचलून श्रीरामांसमोर ते सहज आणू शकत होते. पण त्यांचे काम हे निरोप पोचवायचे होते ते त्यांनी पूर्ण केले.

आपल्या सहवासातील लोकांशी सुरक्षित अंतर ठेवण्याचा नियम, म्हणजे हस्तक्षेप न करण्याचा योग. महाभारतात द्रौपदी आपल्या पाच पतींबरोबर कधी राजवाड्यात राहिली तर कधी वनवासात. तरी त्यांच्यातील संबंध अतिशय प्रेमाचे आणि विश्वासाचे टिकून राहिले. कारण त्यांनी एकमेकांच्या खाजगी आयुष्यात कधीही ढवळाढवळ केली नाही. युधिष्ठिर अतिशय हुशार व अभ्यासू होते. भिमाला भोजन प्रिय. अर्जुन धनुर्धारी. नकुल दिसायला देखणे तर सहदेव पशुपक्ष्यांशी संवाद साधायचे. भिमाच्या जेवणावर किंवा नकुलाच्या दिसण्यावर कुणीही रागावले नाही अथवा त्याचा कुणाला मत्सरही वाटला नाही. त्यामुळे पांडव एकत्र आणि सुखात राहिले.

आत्म्याचा परमात्म्याशी साधलेला परिपूर्ण संपर्क म्हणजे पण योग. मन व बुद्धी समर्पण वृत्तीने भगवंतांच्या प्रेमात एकाग्र करणे म्हणजे योग. पण हा अनुभवाचा भाग आहे आणि हा अनुभव श्रीभगवंतांच्या अथवा श्रीसद्गुरूकृपेने आपल्याला येऊ शकतो. श्रीमाउलींनी ज्ञानेश्वरीमध्ये यालाच कृपायोग किंवा सुखोपाय असे संबोधिले आहे. समर्थ रामदासस्वामींनी हा योग नवविधा भक्तीद्वारे समजावून सांगितला. संत शिरोमणी तुकाराम महाराजांनी अखंड विठ्ठल नामाने भगवंताशी योग साधला.

हा योग साधताना श्रीभगवंत साधकाने अर्पण केलेल्या वस्तूंचा भाव बघत नाहीत, तर ज्याने ती अर्पण केली आहे त्याचा भाव बघतात. प्रभूरामचंद्रांनी शबरीची उष्टी बोरं खाल्ली व आपल्या कृपेने तिचा उद्धार केला. वनवासात असताना, द्रौपदीच्या भांड्यात उरलेले एक भाताचे शीत खाऊन श्रीकृष्ण तृप्त झाले आणि महर्षी दुर्वास अचानक आल्यामुळे ओढवलेल्या प्रसंगातून द्रौपदीची सुटका झाली. श्रीकृष्णाची सुवर्णतुला करताना महालातील सर्व सोनंनाणं संपलं तरी तराजूचं पारडं खाली होईना. शेवटी रुक्मिणीने एक तुलसीपत्र तिचे प्रेम आणि समर्पण भावाचे रूपक म्हणून पारड्यात ठेवल्यावर ते खाली झालं. श्रीभगवंत भगवत गीतेत मध्यावर उपदेश करतात – 'योगक्षेमंवाहामम्यहम' आपल्या गरजेची वस्तू प्राप्त करून घेणे याला योग म्हणतात व असलेली वस्तू सांभाळणे याला क्षेम म्हणतात आणि ते दोन्ही मीच करणार आहे.

आपल्या परिचयाच्या व्यक्तींशी प्रेमाचा संबंध प्रस्थापित करून त्यांना आणि स्वतःला कसे आनंदी व सुखी करावे हे श्रीभगवंतांनी संपूर्ण विश्वाला सांगितले. संबंधाचा आधार हा अपेक्षा नसून विवेक असावा जेणेकरून संबंध हे दीर्घकाळ टिकून राहतात. असा हा योग म्हणजे परिपूर्ण संपर्क आपण आपल्या खाजगी अथवा सामाजिक जीवनात, कुटुंबात आणि कामाच्या ठिकाणी नक्कीच प्रस्थापित करू शकतो, त्याचा अनुभव घेऊ शकतो. आणि तसे झाल्यास हे विश्व खऱ्या अर्थाने एक कुटुंब होईल यात शंका नाही.

## आशापूर्णादेवी : ज्ञानपीठ पुरस्कार

सरकार समाजाची चौकट बदलली तसं त्याचं प्रतिबिंब त्यांच्या लेखनातही उमटू लागले. ह्या सगळ्याचा परिणाम स्त्रिया शिकू लागल्या. पुरुषांचे बरोबरीने समाजातील सर्व शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रांत मानाचे स्थान मिळवू लागल्या. आशापूर्णादेवींनी तीन पिढ्यांमधल्या स्त्रियांच्या होणाऱ्या बदलाचे सूक्ष्म निरीक्षण केले आणि ते लेखनात समर्थपणे मांडले. आशापूर्णादेवींची २०० हून अधिक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. १७८ कादंबऱ्या, ३० कथासंग्रह, ४७ बालवाङ्मय स्वरूपातील पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'दोलाना' ह्या कादंबरीवर सिनेमा निघाला आहे. अनेक भारतीय भाषांमधून त्यांच्या पुस्तकांचे अनुवाद झाले आहेत. ज्ञानपीठ पुरस्काराच्या आधी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

अशा ह्या पहिल्या महिला ज्यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित केले गेले. ८ मार्चला जागतिक महिला दिन साजरा झाला त्या निमित्त ह्या महान लेखिकेला ह्या लेखाद्वारे मानाचा मुजरा.

# राज्यनिर्मितीच्या प्रसववेदना

आंध्र प्रदेशचे विभाजन होऊन साडेचार वर्षांपूर्वी तेलंगणाची निर्मिती झाली. नवीन राज्यनिर्मितीची ही प्रक्रिया वादामुळे गुंतागुंतीची झाली. या संदर्भात प्रशासन, सार्वजनिक कंपन्या यांचे वाटप करण्याबाबत नेमलेल्या समित्यांचे अहवाल लवकरच सादर होणार आहेत.

बिहारचे विभाजन होऊन झारखंड, उत्तरप्रदेशचे विभाजन होऊन उत्तराखंड व मध्यप्रदेशातून छत्तीसगड अशा तीन राज्यांची निर्मिती झाली. ती होताना मोठे जनआंदोलन झाले नाही. उलट ते विभाजन सुलभ झाले. दुसरीकडे चंदीगड हे हरियाना व पंजाबला लागून असल्याने दोन्ही राज्यांची राजधानी बनले. तथापि, हैद्राबादचे तसे नाही. ते आंध्रप्रदेशपासून दूर, पण तेलंगणात असल्याने आंध्रप्रदेशचे विभाजन होताना हैद्राबाद कुणाचे यावरून जोरदार आंदोलन व मतभेद झाले. अखेर ते तेलंगणला मिळाल्याने आंध्रला अमरावती ही नवी राजधानी उभारण्याचे काम हाती घ्यावे लागले. हे विभाजन होताना राज्यनिर्मितीच्या प्रसववेदना तर झाल्याच, पण दक्षिणेत अनेक वर्षे काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जाणाऱ्या दोन्ही राज्यांत काँग्रेसचा मागमूस उरला नाही. आंध्रमध्ये तेलुगू देसमचे चंद्राबाबू नायडू हे मुख्यमंत्री आहेत, तर अलीकडेच तेलंगणातील विधानसभेच्या निवडणुकीत तेलुगू देसम व काँग्रेसने 'महाकुटामी' करूनही हाती अपयश आले. सत्तेची गादी पुन्हा तेलंगण राष्ट्र समितीचे नेते के. चंद्रशेखर राव यांच्याकडेच गेली. दोन जून २०१४ रोजी तेलंगणाची निर्मिती झाली. आंध्रप्रदेशने विभाजनाच्या विधेयकाला जोरदार विरोध केला. खरा लढा होता, तो हैद्राबादच्या मालकीसाठी. अखेर दहा वर्षांसाठी दोन्ही राज्यांची राजधानी हैद्राबाद असेल, यावर कसाबसा समझोता झाला. तेथील सचिवालय दोन राज्यांत विभागले गेले.

आंध्र व तेलंगण यांच्यात राजकीय, वैधानिक व शासकीय मुद्दे महत्त्वाचे होते. १) कर्मचारी, २) अखिल भारतीय सेवा, ३) पूर्वाश्रमीच्या आंध्रप्रदेशातील सुमारे ९१ सार्वजनिक कंपन्यांचे विभाजन या मुख्य समस्या होत्या. त्या सोडविण्यासाठी कमलनाथ (कर्मचारी विभागणी), प्रत्युष सिन्हा (अखिल भारतीय सेवा) व सार्वजनिक कंपन्यांच्या विभागणीसाठी निवृत्त आयएएस अधिकारी डॉ. शीला भिडे यांच्या नेतृत्वाखाली केंद्रातर्फे तीन समित्या स्थापन करण्यात आल्या.. या प्रक्रियेसंदर्भात भिडे म्हणाल्या, की गेल्या चार वर्षात आमच्या समितीच्या शंभरावर अधिक बैठका झाल्या. समितीचे काम संपण्यास जानेवारी २०१९ उजाडावे लागले. याबाबतचा अहवाल येत्या आठवड्यात राज्यांना सादर करण्यात येणार आहे. आंध्रप्रदेश हे कृष्णा, गोदावरीच्या खोऱ्यात असल्याने तेथे लोकसंख्येची दाटी आहे. अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे. हैद्राबादमधील उद्योगधंद्यांमुळे तेलंगण सधन दिसत आहे. १९६० ते ९० दरम्यान हैद्राबादमध्ये अनेक उद्योग आले. तेलंगणचा विकास दिसतो, तो केवळ हैद्राबादभोवती. उलट रायलसीमा भागातील कडप्पा, अनंतपूर, कर्नूल, चित्तूर आदी जिल्हे दुष्काळप्रवण आहेत. दुसरीकडे आंध्रप्रदेशला वावटळ, सागरी वादळे यांपासून धोका संभवतो. म्हणून मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आंध्रसाठी खास दर्जाची मागणी करीत आहेत.

भिडे यांच्या मते, लोकसंख्येला आधार धरून वाटप करताना आंध्र ५८ टक्के तर तेलंगण ४२ टक्के असे परिमाण लावण्यात आले. राज्याच्या संपत्तीचे, त्यातील सार्वजनिक कंपन्या, कर्मचारी यांचे वाटप ही किचकट प्रक्रिया होती. शिवाय दोन्ही बाजूंनी पूर्वग्रह होते. त्यामुळे सहकार्य मिळण्यास व समझोते होण्यास वेळ लागला. भिडे यांच्या समितीने आंध्र व तेलंगणात असलेल्या ९१ सार्वजनिक कंपन्यांची पाहणी व वाटप केले. बव्हंशी कंपन्या हैद्राबाद परिसरात असल्याने त्यांचा लाभ अर्थातच तेलंगणला मिळाला. तथापि, हैद्राबादमधील प्रदूषणामुळे औषधे निर्मिती करणारे व संगणक उद्योग यांनी आपले कारखाने, मुख्यालये आदी आंध्रमध्ये हलविले. त्याचा लाभ आंध्रला झाला. या दोन्ही राज्यांचा विकासाचा दर ११-१२ टक्के असला तरी, आंध्र मोठ्या महसुलाला मुकला, याची खंत तेथील लोकांना आहे. तसेच राजधानी अमरावतीची उभारणी होण्यास किमान दहा वर्षे लागतील. त्यासाठी पैशाचा ओघही कायम असावा लागेल. आंध्रच्या विभाजनावर लिहिलेल्या पुस्तकात काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी तेलंगण राज्यनिर्मितीच्या प्रक्रियेला 'बॅलन्स्ड् डिसूसॅटिसफॅक्शन' (संतुलित असमाधान) असे सूचक शब्द वापरले आहेत, अशी माहिती भिडे यांनी दिली.

सौजन्य - दै. सकाळ, पुणे.

(शब्दांकन - श्री. विजय नाईक)

## शोभादर्शक - आरसे न वापरता

तीन सारख्या लांबी-रुंदीचे आरसे वापरून शोभादर्शक (कॅलिडोस्कोप) तुम्ही बनवला असेलच. त्यातून पाहिले तर आत असलेल्या बारीक वस्तूंच्या अनेकविध प्रतिमा दिसतात. शोभादर्शक त्याच्या अक्षाभोवती गोल फिरवला तर आत त्या प्रतिमांच्या नवनव्या रचना होतात. पण असे आरसे न वापरतासुद्धा तो बनवता येतो बरं का ! कसा ते पाहू या तर ! तुमच्याकडे मायक्रोस्कोपसाठी लागणाऱ्या काचपट्ट्या-स्लाईडस् असतीलच. त्यातील एक पट्टी हातात घ्या. ती तुमच्या डोळ्यांसमोर क्षितिजसमांतर पातळीत २५ ते ३० सेंमी. अंतरावर धरा बरं ! तुमच्या दृष्टिक्षेपाच्या दिशेला तिचा कोन अगदीच कमी, सुमारे १०° असताना, काय दिसते आहे तुम्हाला तिच्यामध्ये ? समोरच्या वस्तूंच्या प्रतिमा दिसताहेत ना ? आता ती पट्टी हळूहळू तुमच्या दृष्टिक्षेपाला लंब दिशेकडे करा बरं ! आता काय दिसते आहे तुम्हाला ? आता त्या पट्टीमधून पलीकडल्या वस्तू दिसत असतील, होय ना ? हं, तुम्हाला प्रकाशाच्या अनेक गुणधर्मांपैकी एक प्रत्ययाला आला. जर आपतन कोन (अँगल ऑफ इंसिडन्स) ७५/८० अंशांपेक्षा जास्त झाला तर प्रकाश काचेत शिरण्यापेक्षा परावर्तीत (रिफ्लेक्ट) होणे पसंत करतो असे दिसते. या तत्त्वाचा वापर करून आपण बिना आरशांचा शोभादर्शक बनवूया. तीन स्लाईड्स एकमेकिंना अशा पद्धतीने टेकवा की त्यांचा समभुज त्रिकोणी प्रिझम बनेल. अशा स्थितीत सेलोटेपने किंवा रबरबँडने तीनही स्लाईड्स घट्ट बांधा. आता तुमच्याकडे काचेची एक त्रिकोणी भोकाची नळी तयार झाली, नाही का ? जरा तिच्या एका टोकाला डोळा लावून तुमच्या मित्राकडे बघा तर खरं. काय दिसते आहे ? काय धम्माल ना ! तुमच्या मित्राच्या चेहऱ्याच्या अनेक प्रतिमा दिसताहेत ना त्यातून ? शोभादर्शक झालाच म्हणायचा ! आणखी गंमत करायची आहे ? मग आपला हा शोभादर्शक त्याच्या अक्षाभोवती हळूहळू फिरवा बरं ! हं, तुमच्या मित्राचे चेहरे फेर धरून नाचायला लागले की नाही ? जर तुम्ही या त्रिकोणी नळीचे एक तोंड अर्धपारदर्शक कागदाने (बटर पेपरने) बंद केलेत आणि मग २-४ छोटे रंगीत मणी टाकलेत व दुसरे तोंड पारदर्शक प्लास्टीकने-पॉलिथिन बॅगने बंद केलेत की मग नेहमीचा शोभादर्शक झाला बरं का तयार ! मग काय आता बाजारातून तयार शोभादर्शक आणणार की स्वतः तयार करणार ?

साप्ताहिक प्राजक्त

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI * Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS